आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ मार्च २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २०३० पर्यंत व्यापार ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्यावर भारत आणि कॅनडा यांच्यात सहमती

- अमेरिकेसोबत चर्चा करायला इराणचा नकार, अमेरिका आणि इस्रायलकडून हल्ले तीव्र

- पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांना सावधगिरी बाळगण्याचं केंद्राचं आवाहन

- शेअर बाजारात मोठी घसरण, सोनं-चांदी आणि कच्च्या तेलाच्या दरात वाढ

**आणि**

- माजी खासदार, साहित्यिक डॉ. जनार्दन वाघमारे यांचं निधन

<><><><><>

भारत आणि कॅनडा यांच्यातला व्यापार २०३० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे. दोन्ही देशांमधला सर्वंकष व्यापार करार पूर्ण करण्यावरही सहमती झाल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासोबत नवी दिल्लीत चर्चा केल्यावर ते वार्ताहरांना संबोधित करत होते. दोन्ही देशातल्या व्यापार करारामुळं दोन्ही देशांमध्ये गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी वाढतील असं प्रधानमंत्री म्हणाले.

**- - होल्ड - प्रधानमंत्री - - -**

भारत आणि कॅनडा संरक्षण संवाद स्थापन करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. तसंच यावर्षी संयुक्तपणे नवीकरणीय ऊर्जा परिषद आयोजित केली जाणार आहे. दोन्ही देशांमधल्या विविध विद्यापीठांमध्येही याप्रसंगी विविध करार झाले. दहशतवाद आणि कट्टरतावाद मानवतेसाठी घातक असल्यावर दोन्ही देशांमध्ये एकमत असल्याचं प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले.

द्विपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचा दोन्ही नेत्यांनी चर्चेदरम्यान आढावा घेतला. व्यापक आर्थिक भागिदारी कराराच्या संदर्भशर्तींवर दोन्ही देशांनी सह्या केल्या. दीर्घकालीन

युरेनियम पुरवठा करारावरही आज सह्या झाल्या. दोन्ही देशांच्या नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्रालयांमधे तांत्रिक सहकार्य वाढवण्याबाबत सामंजस्य करार झाला.

**<><><><><>**

अमेरिकेसोबत वाटाघाटी करायला इराणने स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चर्चेची तयारी दाखवली होती. एका माध्यमसंस्थेच्या वाटाघाटीची शक्यता वर्तवणाऱ्या वृत्ताला उत्तर म्हणून लष्करी अधिकारी अली लारिजानी यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करत वाटाघाटीच्या शक्यता फेटाळून लावल्या. अमेरिका आणि इस्त्रायलनं इराणवरचे हल्ले तीव्र केले आहेत.

याबाबत अधिक माहिती घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**----व्हीसी------**

*(अयातुल्लाह खामेनी यांच्या हत्येचा इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरागची यांनी निषेध केला आहे. अमेरिका आणि इस्त्रालयचा हल्ला बेकायदेशीर असून इराण स्वसंरक्षणासाठी प्रत्युत्तर देत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणनेही प्रतिहल्ले करत इस्त्रायल आणि अरब देशांवर क्षेपणास्त्रं डागली आहेत.*

*ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या युरोपियन देशांनी अमेरिका आणि इस्त्रायलला मदतीचा हात पुढे केला आहे. तर आखाती देशांनीही इराणला प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे.*

*दरम्यान, अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्त राष्ट्रात कोणतीही चर्चा न करता इराणवर हल्ला केल्याबद्दल फ्रान्सचे परराष्ट्र व्यवहार मंत्री जीन नोवेल बॅरत यांनी टीका केली आहे. प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्याबद्दल त्यांनी इराणवरही टीका केली. अयातुल्लाह खामेनी यांना गमावल्यानंतर इराण सरकारने हल्ले थांबवायला हवेत असं बॅरत म्हणाले.*

*इराणने आखाती देशातल्या विमानतळ, बंदरं आणि निवासी क्षेत्रांना लक्ष्य केलं आहे. बहरीनमधल्या क्लाऊड युनिटच्या डेटा सेंटरमधे वीज कपातीच्या समस्या जाणवत आहेत, असं ॲमेझॉनने म्हटलं आहे. हिजबोल्ला इराणच्या मदतीला धावून आली असून आपण इस्त्रायलवर प्रतिहल्ले केल्याचं त्यांच्या प्रतिनिधींनी म्हटलं आहे. त्यानंतर इस्त्रायलने लेबननवर केलेल्या हवाई हल्ल्यात ३१ जणांचा मृत्यू झाला. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर गाझा पट्टीत जाणारी मानवतवादी मदत रोखण्यात आल्याचं इस्त्रायलनं सांगितलं.)*

**<><><><><>**

अमेरिका आणि इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यांमध्ये इराणमधले ५५५ जण मारले गेले आहेत. आग्नेय इराणमधल्या मिनाब शहरात झालेल्या हल्ल्यात १८० शाळकरी मुलं मृत्युमुखी पडली आहेत. दरम्यान प्रत्युत्तरादाखल आतापर्यंत इराणने बहरीन, इराक, जॉर्डन, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांमधल्या विविध प्रांतांवर हल्ले केले आहेत. सायप्रस इथल्या यूकेच्या लष्करी तळाच्या धावपट्टीवरही इराणने ड्रोन हल्ला केला. यापैकी बहुतांश हल्ले रोखण्यात आले. इराणने मध्य इस्रायलमध्ये केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात नऊ जण ठार, तर २०हून अधिक जण जखमी झाले. कुवैतमध्ये इराणच्या हल्ल्यात चार अमेरिकन सैनिक ठार, तर पाच जण गंभीर जखमी झाले. इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात लेबनॉनमधले ३१ जण ठार तर १४९ जण जखमी झाले.

<><><><>

या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सौदी अरेबियाचे प्रधानमंत्री मोहम्मद बीन सलमान, आणि बहरीनचे राजे हमद बीन इसा अल खलिफा यांच्याशीही दूरध्वनीवरून चर्चा केली. या दोन्ही देशांवर नुकत्याच झालेल्या हल्ल्याचा मोदी यांनी निषेध केला.

<><><><>

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं सर्व राज्यांना पत्र पाठवून सावधगिरी बाळगण्याचं आवाहन केलं आहे. इराणच्या बाजूनं बोलणाऱ्या कट्टरपंथी लोकांची ओळख पटवायला केंद्रीय गृहमंत्रालयानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर कारवाईची गरज यात व्यक्त केली आहे.

<><><><>

पश्चिम आशियातलं युद्ध सुरू झाल्याचा मोठा परिणाम आज जगभरातल्या शेअर बाजारात दिसून आला. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार ४८ अंकांनी घसरुन ८० हजार २३९ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३१३ अंकांची घट नोंदवून २४ हजार ८६६ अंकांवर थांबला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्स ७८ हजार ५०० पर्यंत आणि निफ्टी २४ हजार ६०० पर्यंत घसरला होता. संरक्षण वगळता इतर सर्वच क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज घसरले. विमान कंपन्या, पेट्रोलियम कंपन्यांच्या

समभागांना या घसरणीचा जास्त फटका बसला. युरोप, आशियायी देशांमधल्या शेअर बाजारांमध्येही आज मोठी घसरण दिसून आली.

सोन्याचांदीचे दर आज मोठ्या प्रमाणात वधारले. मुंबईच्या सराफा बाजारात १ तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ७२ हजार रुपये, तर १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ७१ हजार ८०० रुपये मोजावे लागत होते. १ किलो चांदी २ लाख ९८ हजार रुपयांना मिळत होती.

कच्च्या तेलाचे दरही सुमारे साडे ७ टक्क्यांनी वधारुन साडे ७८ डॉलर प्रति बॅरेलपर्यंत पोहोचले.

परकीय चलन बाजारात डॉलरच्या तुलनेत रुपया ५० पैशांनी घसरला. त्यामुळं एका डॉलरसाठी ९१ रुपये ४७ पैसे मोजावे लागत होते.

<><><><><>

माजी खासदार, माजी कुलगुरू, साहित्यिक आणि थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांचं आज सकाळी लातूरमध्ये निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी पॅरालिसिसचा झटका आल्यामुळं त्यांच्यावर घरगुती उपचार सुरू होते.

वाघमारे यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता औसा तालुक्यातल्या कवठा या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वाघमारे यांना आदरांजली अर्पण केली आहे.

<><><><><>

फिनलंडचे अध्यक्ष डॉ अलेक्झांडर स्टब येत्या बुधवारपासून ४ दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. ११ व्या रायसिना संवादाला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित असतील. बीजभाषणही ते करतील. मंत्री, वरीष्ठ अधिकारी आणि उद्योजकांचं शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल. या दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी त्यांची परस्पर सहकार्य मजबूत करण्याविषयी व्यापक चर्चा होईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही ते भेट घेतील.

त्यानंतर ते मुंबईत महाराष्ट्राचे राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांची भेट घेतील, तसंच भारतीय उद्योजकांशी संवाद साधतील. भारत-फिनलंड उद्योग-व्यापर विषयक कार्यक्रमाला स्टब उपस्थित राहणार आहेत, तसंच मुंबई विद्यापिठात विद्यार्थ्यांना संबोधित करणार आहेत.

<><><><><>

नागपूर इथल्या स्फोटक निर्मिती कारखान्यातल्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १९ इतकी झाली आहे. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात काल हा स्फोट झाला. पोलिसांनी या कंपनीच्या २१ संचालक आणि भागधारकांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला असून ९ संचालकांना अटक केली आहे.

<><><><><>

भविष्य निर्वाह निधीवरचे व्याजदर चालू आर्थिक वर्षातही सव्वा ८ टक्केच राहणार आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या विश्वस्त मंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. सलग तिसऱ्या वर्षी हे दर सव्वा ८ टक्के राहणार आहेत.

//<><><><><>//